अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | बुधवार
१२.०८.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १९३ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

**मित्राच्या बर्थ डे सेलिब्रेशनला जाताना भरधाव कारचा भीषण अपघात**

## उभ्या ट्रकला जोरदार धडक, कारचा अक्षरशः चेंदामेंदा, अल्पवयीन दोघांचा जागीच मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***नागपुर*** – नागपुरात भीषण अपघाताची घटना घडला आहे. यात मित्राच्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशनला जाताना भीषण अपघात झाला आहे.

या भीषण अपघातात दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून एक जण जखमी झाल्याची माहिती आहे. नागपुरात पहाटेच्या सुमारास हा अपघात झाला असून अपघातात मृत झालेले दोन्ही तरुण अल्पवयीन असल्याची माहिती आहे. तर यातील एक जण गंभीर जखमी झाला असून त्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. कळमना पोलीस स्टेशन हद्दीतील पावनगाव ते भरतवाडा वाय पॉईट रोडवर हा भीषण अपघात घडला आहे.

उभ्या ट्रकला जोरदार धडक, कारचा अक्षरशः चेंदामेंदा, दोघांचा जागीच मृत्यू मिळालेल्या माहितीनुसार, आज (१२ ऑगस्ट) पहाटेच्या सुमारास हा अपघात झाला असून हा अपघात इतका भीषण होता की यात कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाली असून कार किती भरधाव असेल यांचा अंदाज लागतोय. मिहीर आनंद बेहार, भौमिक अमोल लारोकर आणि सागर संजय मेलवाणी हे तिघे मित्र वाढदिवस साजरा करण्यासाठी जात होते. मिहीर हा वडिलांची कार चालवत होता. मित्र येण्यास वेळ असल्याने तिघेही कारमधून फेरफटका मारत होते. याचवेळी भरधाव कारने रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकला मागून जोरदार धडक दिली.

या अपघातात भौमिक लारोकर आणि सागर मेलवाणी यांचा जागीच मृत्यू झाला. तर कारचालक मिहीर बेहार जखमी झाला असून त्याच्यावर तारांगण हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. कळमना पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद करत पुढील तपास सुरू केला आहे. मात्र या घटनेने कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## घाटकोपरमध्ये दरड कोसळली : ६ जणांचा मृत्यू

### अनेक घरे मलब्याखाली : बचावकार्य सुरु

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**मुंबई** – मुंबईतील घाटकोपर परिसरातील चिराग नगर येथे बुधवारी (दि.१२) पहाटेच्या सुमारास दरड कोसळून मोठी दुर्घटना घडली.

टेकडीचा काही भाग जवळील गौशिया चाळीवर कोसळल्याने ढिगाऱ्याखाली दबून ६ जणांचा मृत्यू झाला असून, आणखी काही जण अडकल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दल, एनडीआरएफ आणि महापालिकेच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेत युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केले आहे. सततच्या पावसामुळे ही दरड कोसळल्याची प्राथमिक माहिती आहे.

**टेकडीचा काही भाग खचला अन...**

चिराग नगर परिसरातील राठोड मेडिकलजवळील गौशिया चाळीत बुधवारी पहाटे सुमारे ३.४८ वाजता भूस्खलन झाले. मंगळवारी रात्रीपासून मुंबईत सुरू असलेल्या संततधार पावसानंतर टेकडीचा काही भाग खचला आणि त्याचा ढिगारा चाळीतील दोन ते तीन खोल्यांवर कोसळला. अचानक झालेल्या या दुर्घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली.

**मृतांचा आकडा सहावर**

सुरुवातीला या दुर्घटनेत दोन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती होती. त्यानंतर बचावकार्य सुरू असताना मृतांचा आकडा वाढत गेला असून, आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

मृतांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. यापूर्वी साहिल अन्सारी (२८) आणि मोहम्मद समीर (१४) यांना ढिगाऱ्याखालून बाहेर काढून राजावाडी रुग्णालयात नेण्यात आले होते. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

**आणखी काही जण अडकल्याची भीती**

दुर्घटनेनंतर सुरुवातीला तीन ते चार जण ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती.

मात्र, स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार हा आकडा वाढण्याची शक्यता असून आणखी काही जण ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे बचाव पथकांकडून ढिगारा हटवून अडकलेल्यांचा शोध घेण्याचे काम वेगाने सुरू आहे.

## थोडक्यात

### नवीन जन्म-मृत्यू प्रमाणपत्र आता तीन दिवसांत मिळणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – जन्म, मृत्यू, विवाह प्रमाणपत्रासाठी वाया जाणारा वेळ आणि धावपळ आता कमी होणार आहे. नव्याने नोंदणी केलेल्या जन्म, मृत्यू, विवाह प्रमाणपत्र पालिकेच्या कार्यालयीन दिवसांत तीन दिवसांत कधीही मिळणार आहे. तसेच जन्म–मृत्यू प्रमाणपत्रातील दुरुस्तीसाठी २५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. जन्म प्रमाणपत्रात बालकाचे नाव समाविष्ट करणे, बाळाच्या जन्म प्रमाणपत्रातील आई–वडील यांच्या नावात दुरुस्ती, मूळ व तात्पुरता पत्त्यात दुरुस्ती, तारीख चूक दुरुस्ती, लिंग चूक दुरूस्ती आदीसारख्या दुरुस्तीसाठीचे अर्ज करता येणे शक्य झाले आहे.

## 'संसदेत कोणत्याही प्रश्नाचं उत्तर देण्यास तयार', पण...

**गृहमंत्री अमित शाहांचा विरोधकांना टोला**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***नवी दिल्ली*** – संसदेत सुरू असलेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पहिल्यांदाच आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ङ्गमी संसदेत कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देण्यास तयार आहे. सरकारकडे लपवण्यासारखे काहीही नाही,ङ्घ असे अमित शाह यांनी म्हटले आहे. मात्र, त्यांच्या या वक्तव्यावर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी जोरदार पलटवार केला आहे.

अमित शाह यांनी विरोधकांकडून होत असलेल्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना म्हटले की, अधिवेशन सुरू झाल्यापासून आपण नियमितपणे संसदेत उपस्थित राहत आहोत आणि आपल्या दालनातही बसत आहोत. मात्र, विरोधक दोन्ही सभागृहांचे कामकाज रोखत असल्याने चर्चा कशी होणार, असा सवाल त्यांनी केला.

'कोणत्याही प्रश्नाचं उत्तर देण्यास तयार' : अमित शाह यांच्या म्हणण्यानुसार, सरकारने चर्चेसाठी आधीपासूनच तयारी दर्शवली आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनीही विद्यार्थी आंदोलनाच्या सर्व पैलूंवर चर्चा करण्यासाठी सरकार तयार असल्याचे स्पष्ट केले आहे. विरोधकांनी चर्चेसाठी वेळ द्यावा आणि चर्चेसाठी तयार राहावे. सुरुवातीला त्यांची हीच मागणी होती आणि आम्ही ती मान्य केली. मी संसदेत कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देण्यास तयार आहे, अशी भूमिका अमित शाह यांनी मांडली. मात्र, विरोधकांना चर्चा करायचीच नसून संसदेचे कामकाज ठप्प करायचे असल्याचा आरोप त्यांनी केला.

'लेक्चर ऐकण्यात विरोधकांना रस नाही' : अमित शाह यांनी पुढे सांगितले की, संसदेत कोणत्याही गंभीर विषयावर चर्चा करण्यासाठी ठरावीक नियम आणि कार्यपद्धती आहे.

## शिरवळजवळील भीषण कार अपघातात पुण्यातील ४ युवक ठार

**दोघे गंभीर जखमी**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



***कराड*** – पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर पुणे–सातारा मार्गावरील शिरवळ गावच्या हद्दीत सोमवार–मंगळवारदरम्यान मध्यरात्री झालेल्या भीषण कार अपघातात पुणे जिल्ह्यातील चार युवकांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले. जखमींवर शिरवळ येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मृतांमध्ये वेदांत अर्जुन वारिंगे (१९), सोनलिंग धीरेंद्र ठाकूर (१९), आदित्य बाळासाहेब गरुड (१९) आणि निखील बाळू राऊत (२०) यांचा समावेश आहे, तर दिक्षीत दयानंद पुजारी (२०) आणि कारचालक मयुर हनुमंत शिंदे (२०) हे गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, हे सहा युवक सोमवारी रात्री सुमारे कारने पावसाळी पर्यटनासाठी पुण्याहून महाबळेश्वरकडे निघाले होते. मध्यरात्री सुमारे १ वाजता शिरवळ गावच्या हद्दीत एका हॉटेलसमोर कार आली असता चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. कार महामार्गाच्या दुभाजकाला धडकून तीन ते चार वेळा पलटी झाली आणि विरुद्ध दिशेच्या मार्गिकेवरून येणाऱ्या आयशर मालट्रकवर जोरदार आदळली.

या अपघातात कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. कारमधील मृतदेह आणि जखमी वाहनात अडकल्याने त्यांना बाहेर काढण्यासाठी शिरवळ रेस्क्यू टीम आणि स्थानिक नागरिकांना तब्बल तीन तासांहून अधिक काळ प्रयत्न करावे लागले. घटनेची माहिती मिळताच फलटणचे उपविभागीय पोलीस अधिकारी धन्यकुमार गोडसे, शिरवळचे पोलीस निरीक्षक महेश इंगळे आणि सारोळा महामार्ग मदत केंद्राचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हणमंत पडळकर यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी धाव घेतली.

## विलेपार्लेमधील इमारतीला भीषण आग, २ जणांचा मृत्यू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)






***मुंबई*** – मुंबईच्या विलेपार्ले पश्चिमेकडील नानावटी हॉस्पिटल शेजारील शांता भवन इमारतीत आग लागल्याची घटना समोर आली होती.

एका बाळासह दोन जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले आहेत. मुंबई अग्निशमन दलाच्या माहितीनुसार, मंगळवारी (११ ऑगस्ट) रात्री सुमारे १० वाजता आगीची माहिती मिळाली. सुरुवातीला आगीची तीव्रता लेव्हल–१ होती; मात्र रात्री १०.१६ वाजता ती लेव्हल–२ इतकी वाढली. अग्निशमन दलाच्या अथक प्रयत्नांनंतर रात्री सुमारे १ वाजता आग आटोक्यात आणण्यात आली.

अकराव्या मजल्यावर लागलेल्या आगीत केअरटेकर आणि मुलाचा होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ज्या विकासाकाने इमारत बांधली तो अकराव्या मजल्यावर राहत होता. मात्र रात्री ११०२ या फ्लॅटमध्ये आग लागल्यानंतर घरात काम करणारी केअरटेकर अंकिता यांनी विकासकाचा नातू याचा जीव वाचवण्यासाठी घरातील कोपऱ्यात जाण्याचा प्रयत्न केला आणि त्या ठिकाणी प्रचंड धुर आणि आगीमुळे श्वास गुदमरून दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.





**वरुड :** अमरावतीच्या औद्योगिक विकासासाठी आणि तरुणांच्या रोजगारासाठी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी भेट घेतली. जिल्ह्यातील भारत डायनामिक्स लिमिटेडच्या प्रस्तावित क्षेपणास्त्र निर्मिती प्रकल्पाला लवकरात लवकर मंजुरी देऊन काम सुरू करण्याची मागणी केली.

# पेपरफुटीला आळा घालण्यासाठी नियम बनवा : मंत्री चंद्रकांत पाटील यांची विद्यापीठांना सूचना

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



***मुंबई*** – परीक्षांमधील पेपरफुटीच्या प्रकरणांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारच्या धर्तीवर विभागाने मार्गदर्शक नियमावली तयार करून प्रसिद्ध करावी. पेपरफुटी रोखण्यासाठी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणारे परिपत्रक प्रसिद्ध करून सूचना निर्गमित कराव्यात, अशा सूचना उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी विद्यापीठांना दिल्या. मंत्रालयात पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलगुरूंची ऑनलाइन बैठक पार पडली. यावेळी राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील विविध विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच शैक्षणिक वर्ष २०२६-२७ आणि २०२७-२८ पासून चौथ्या वर्षाच्या ऑनर्स पदवी अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक शैक्षणिक आराखडा तयार करावा, असे निर्देश पाटील यांनी बैठकीत दिले.

# गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप आर्थीक मदत नाही

## किसान न्याय हक्क संघर्ष समिती व शेतकऱ्यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**वरुड** – तालुक्यात मे महिन्यात गारपीट होऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले त्या त्यावेळी शेतकरी यांचे हित लक्षात घेता गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना अनुदान शासनाने मंजूर केले व १० जुलै २०२६ ला शासन निर्णय निर्गमित करुन शेतकऱ्यांना गारपीटीचे अनुदान देण्याचे प्रशासनाला कळविले एक महिन्याचा कालावधी होऊन सुद्धा आजपर्यंत शेतकऱ्यांना गारपीट अनुदान मिळालेले नाही, त्यामुळे किसान न्याय हक्क संघर्ष समिती व शेतकऱ्यांचे वतीने मुख्यमंत्री व तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, सन २०२६ चे गारपीट अनुदानाची रक्कम शेतकऱ्याच्या खात्यात तात्काळ जमा करण्यात यावी, सर्व शेतकऱ्यांना तहसीलदार यांनी लवकरच सर्व शेतकऱ्यांना केवायसी करीता व्हि के नंबर देऊन शक्य तेवढे लवकर शेतकऱ्यानां गारपीट अनुदान त्यांचे खात्यात वर्ग करण्यास युद्ध पातळीवर प्रयत्न करुन शेतकऱ्यांना कसे लवकर गारपीट अनुदान देता येईल, या करिता प्रयत्नशील राहू असे आश्वासन दिले.

सदर निवेदन देते वेळी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती नरेंद्र उर्फ बबलू पावडे, उपसभापती बाबाराव मांगुळकर, किसान न्याय हक्क संघर्ष समितीचे स्वप्नील खांडेकर, तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष तुषार निकम, वैभव पोतदार, अंकुश बोंडनासे, चंद्रकांत बोंडनासे, धनराज गजभिये, अमोल भुयार, अनिल साबळे, अनंत वानखडे, पिंटू कोरडे, नरेंद्र पांडव, लिलाधर चौधरी, सुधाकर टेकोडे, दिगंबर दौड, प्रतीक पावडे, अतुल पावडे, दिनेश गाढवे, बाबाराव गजभिये, सारंग बोंडाचे, शकील शहा, रवींद्र ताथोडे व दशरथ खंडुरकर उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या परिवहन सुविधांबद्दल सक्तीचे आदेश द्या

## प्रहारचे अजय चौधरी यांची मागणी

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**वरुड** – तालुक्यातील सर्व शाळा-महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना ने-आण करणाऱ्या स्कूल व्हॅन व बसेसची चौकशी करुन सर्व स्कूल व्हॅन व बसमध्ये वाहकाची सक्ती करण्यात यावे तसेच विद्यार्थ्यांच्या परिवहन सुविधांबद्दल सक्तीचे आदेश द्या, अशी मागणी प्रहारचे अजय चौधरी यांनी केली आहे.

याबाबत अजय चौधरी यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात नमुद केले आहे की, तालुक्यातील जवळपास सर्वच शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ने-आण करण्याकरीता पालकांमार्फत खाजगी स्कुल व्हॅन तसेच शाळे मार्फत स्कूल बस चालविल्या जातात. अनेक स्कुल व्हॅन मध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवास करतात. तर स्कुल बस मध्ये कोणताही वाहक नसतांना चालकाच्या भरवशावर ही विद्यार्थी बस मधून प्रवास करतात. विद्यार्थी बस मधून उतरले किंवा चढले की नाही, याची चालक सिट वरुन चौकशी होऊ शकत नाही.

तसेच सदर विद्यार्थी हे लहान असल्यामुळे अनेकदा त्यांना बसमध्ये चढतांना किंवा उतरतांना समस्या होते. त्याची जाणीव स्कूल बस चालकाला नसते. त्यामुळे शाळा-महाविद्यालयाकरीता चालविण्यात येणाऱ्या बसेसमध्ये वाहकाची नियुक्ती असावी जेणे करुन विद्यार्थ्यांना चढतांना-उतरतांना समस्या येणार नाही.

तसेच त्यांच्या जीवावर बेतणार नाही. तसेच स्कूल व्हॅन या क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची ने-आण करीत असतात त्याची प्रत्येकवेळी चौकशी प्रत्येक शाळेच्या परिवहन समितीकडून तसेच स्थानिक पोलीस स्टेशनकडून होणे गरजेचे आहे. शाळा परिवहन समिती व पोलीस विभागाच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांच्या जिवनाशी समस्या निर्माण होऊ शकते. प्रशासनाने अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील रिध्दपुर येथील विद्यार्थीनीच्या अपघाती मृत्युपासून बोध घेऊन भविष्यात अशी दुर्दैवी घटना घडणार नाही, करीता तात्काळ उपाययोजना करावी, विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या वाहनांची आर.टी.ओ.मार्फत चौकशी करण्यात यावी, कागदपत्रे शाळा परिवहन समिती जवळ शाळेतही जमा करण्यात यावे. क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी वहन करणाऱ्या स्कूल बस यांचेसोबतच शाळा परिवहन समिती यांच्यावर कारवाई करावी, संबंधित विभागाने व पोलीस विभागानेही या कामी दुर्लक्ष करु नये, असे आदेश देण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

# मराठे फक्त प्रचारासाठीच आहेत का? - मनोज जरांगे

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***सातारा*** – मराठा आरक्षणाच्या प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलनाची भूमिका कायम ठेवणारे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील सध्या पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. सांगलीनंतर आता ते सातारा जिल्ह्याच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर दाखल झाले आहेत. उद्या पाटणमध्ये त्यांची जाहीर सभा आणि साताऱ्यात पत्रकार परिषद होणार आहे. दरम्यान, जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटी येथे उपोषणाचा इशारा दिल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारही सक्रिय झाले आहे. मराठा आरक्षण उपसमितीची सह्याद्री अतिथीगृहावर महत्त्वाची बैठकही होणार आहे.

## गंगुबाई नामदेवराव शेरेकर विद्यालयात

# दानशुर व्यक्तींच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**वरुड** – तिवसाघाट येथील गंगुबाई नामदेवराव शेरेकर विद्यालयात दानशुर व्यक्तींच्या सामाजिक योगदानातून विद्यार्थ्यांसाठी गणवेश वितरणाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

गरजु व होतकरु विद्यार्थ्यांना शालेय गणवेश उपलब्ध करुन देत शिक्षणाच्या प्रवाहात त्यांना प्रोत्साहन देण्याचा स्तुत्य उपक्रम यावेळी राबविण्यात आला.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गणवेशाचे वाटप करण्यात आले. नवीन गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. दानदात्यांच्या या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार असुन शिक्षणासाठी नवी प्रेरणा मिळणार आहे.

यावेळी मुख्याध्यापक सुधिर श्रीराव, ममता खासबागे, सतिश नेरकर, कुमूद भोरकर, हेमंत चौकडे, हिरेंद्र देसली, लक्ष्मीकांत बिलथरिया तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळेच्या वतीने दानदात्यांचे आभार मानुन त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी समाजातील दातृत्वाचा हात पुढे येणे ही प्रेरणादायी बाब आहे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियन तर्फे

# माँ पिंगळा देवी गड गोराळा येथे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



***मोर्शी*** – महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियन तर्फे मोर्शी तालुक्यातील माँ पिंगळा देवी गड गोराळा येथे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर संपन्न झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र स्वाभिमानी वर्कर्स युनियन कॉ.कॉ.पी.बी.उके होते तर उदघाटक म्हणुन महावितरण अधीक्षक अभियंता दिपक देवहाते होते. विशेष उपस्थितीमध्ये मुंबईच्या महावितरण प्रकाशगड महाव्यवस्थापक राजेंद्र पांडे व सिटूसरचिटणीस कॉ.एम.एच.शेख होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन कार्याध्यक्ष कॉ.डी.बी.बोर्डे व मोर्शी विभाग कार्यकारी अभियंता विजयकुमार कासट होते. कॉ.एम.एच.शेख यांनी आजची राजकीय परिस्थिती आणि कामगारांपुढील आव्हाने या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

राजेंद्र पांडे यांनी आनंद, कॉ.राजेश कठाळे यांनी संघटनात्मक कामकाज, कॉ.दीपक नागे यांनी कंपनीतील सेवानियमन, दुसऱ्या दिवशी कॉ.डी.बी.बोर्डे यांनी कामगार कायदे, कॉ.सुनील देशमुख यांनी कामगार संघटना, कॉ.विवेक महाले यांनी सुरक्षा साधने व विज उद्योग, कॉ.टी.एम.गवळी यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची कर्तव्य व जबाबदाऱ्या, कॉ.सतीश जायले यांनी शाखा सचिव यांचा पत्रव्यवहार व संघटनात्मक कामे, कॉ.सुदर्शन खोड यांनी अनुकंपधारका पुढील आव्हाने व दिशा या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर कार्यक्रमाचा समारोप झोन सचिव कॉ.कपिल झाडे यांनी केला.

कार्यक्रमाचे संचालन सर्कल सचिव कॉ.सुनील बावनकर यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी करण्यामध्ये कॉ.कपिल झाडे, कॉ.सुनील बावनकर, कॉ.मुकेश मोरे, कॉ.निलेश तरुडकर, कॉ.दिनेश शेकापुरे, कॉ.राहुल घड्डीनकर, कॉ.दीपक पीढेकर, निमकर, सुरज ईसळ, कॉ.गणेश खासबागे, राजेश रायते, रोशन गायकी, दुर्गादास बनसोड, सुमित पाध्ये व इतर सभासद पदाधिकारी यांनी केले.

संघटनेच्या व इतर सर्व मान्यवरांनी केलेले अमुल्य मार्गदर्शनाबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# वघाळ जिल्हा परिषद उर्दू शाळेतील अन्शानुर पठाण ही विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**वरुड** – महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचे तर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता ७ वीच्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक उर्दू शाळा वघाळच्या विद्यार्थीनीने सुयश प्राप्त करीत शाळेच्या यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

अन्शानुर शफिउल्लाखा पठाण असे यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थीनीचे नाव असुन ती जि.प.पूर्व माध्यमिक उर्दू शाळा वघाळ येथे आठव्या वर्गात शिकत आहे. मागच्या वर्षी सुद्धा महेक परवीन शाहिद खान हीने शिष्यवृत्ती परीक्षेत यश प्राप्त केले होते. अन्शानुर शफिउल्लाखा पठाण हिने शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केल्याप्रित्यर्थ उर्दू शाळेचे मुख्याध्यापक अफसर खान, मराठी मुख्याध्यापक प्रकाश विंचुरकर, शहनाज परवीन, शबनम वसीम शहा, परवीन शोएब बहिना, देवानंद बागडे, रंजना परतेती, मेघा खोपे, ज्योती चांदूरकर, वनीता शिंदे यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. शिष्यवृत्ती परीक्षेत अन्शानुर शफिउल्लाखा पठाण हिने मिळविलेल्या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे, केंद्रप्रमुख अरविंद वानखडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जाहीद अली, उपाध्यक्ष साजीद अली यांनी अन्शानुर व तिच्या शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे हे वारंवार विद्यार्थ्यांना व शिक्षकांना प्रेरणा देत असुन शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेत १०० टक्के विद्यार्थ्यांनी सहभागी होण्यावर त्यांचा भर आहे. या प्रेरणेमुळे तालुक्यातील शिक्षक आता विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षेसाठी मेहनत घेत असल्याचे चित्र तालुक्यात पहायला मिळत आहे.

# संपादकीय


**कडू बोलणाऱ्या मित्रापेक्षा गोड बोलणारा शत्रू जास्त धोकादायक असतो.**

## नोटांची झीज थांबविण्यासाठी नवा प्रयोगः पॉलिमर चलनाची चाचणी

भारतीय चलनव्यवस्थेत काळानुरूप बदल घडवून आणण्याच्या प्रयत्नांना आता आणखी एक महत्त्वाचे वळण मिळाले आहे. १० आणि २० रुपयांच्या नोटांसाठी पॉलिमर अर्थात प्लास्टिक नोटांच्या चाचणीला मंजुरी मिळाल्याची माहिती समोर आली आहे. तब्बल एक अब्ज पॉलिमर नोटांच्या निर्मिती व चाचणीचा प्रस्ताव हा केवळ चलनाच्या स्वरूपातील बदल नसून, भारतीय अर्थव्यवस्थेला अधिक टिकाऊ, स्वच्छ आणि आधुनिक बनविण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल मानावे लागेल. कागदी नोटांच्या तुलनेत पॉलिमर नोटा अधिक टिकाऊ असल्याचा दावा अनेक देशांच्या अनुभवातून पुढे आला आहे. त्यामुळे भारतातही या पर्यायाची व्यवहार्यता तपासली जात आहे. भारतात चलनाच्या नोटांचा वापर प्रचंड प्रमाणावर होतो. विशेषतः १० आणि २० रुपयांच्या नोटा दैनंदिन व्यवहारात मोठ्या प्रमाणात फिरत असतात. चहा, नाश्ता, किरकोळ बाजार, सार्वजनिक वाहतूक, लहान दुकाने, शेतकरी बाजारपेठा अशा असंख्य ठिकाणी या नोटांचा वापर होतो. परिणामी त्यांची झीजही तुलनेने अधिक होते. नोटा खराब झाल्यानंतर त्या चलनातून काढून नव्या नोटा बाजारात आणाव्या लागतात. यासाठी मोठ्या प्रमाणावर कागद, शाई, ऊर्जा आणि मनुष्यबळ खर्च होते. पॉलिमर नोटांचा पर्याय या प्रक्रियेत काही प्रमाणात बदल घडवून आणू शकतो. पॉलिमर नोटा म्हणजे विशेष प्रकारच्या सिंथेटिक पदार्थापासून तयार केलेल्या नोटा. त्या सामान्य कागदी नोटांपेक्षा अधिक मजबूत आणि पाण्याला तुलनेने प्रतिरोधक असतात. त्यामुळे पावसात भिजणे, घामामुळे खराब होणे किंवा सततच्या हाताळणीमुळे नोट फाटणे यासारख्या समस्या कमी होण्याची शक्यता असते. विशेषतः भारतासारख्या विविध हवामान असलेल्या देशात हा गुण महत्त्वाचा ठरू शकतो. मात्र केवळ टिकाऊपणा हा पॉलिमर नोटांचा एकमेव फायदा नाही. बनावट नोटांना आळा घालण्यासाठीही आधुनिक सुरक्षा वैशिष्ट्ये महत्त्वाची आहेत. पॉलिमर नोटांमध्ये पारदर्शक भाग, विशेष सुरक्षा चिन्हे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची शक्यता असते. त्यामुळे बनावट नोटा तयार करणे अधिक कठीण होऊ शकते. भारतात बनावट चलनाविरुद्ध सातत्याने उपाययोजना केल्या जात आहेत. अशा परिस्थितीत सुरक्षित चलननिर्मितीला विशेष महत्त्व आहे. तथापि, पॉलिमर नोटांचा निर्णय घेताना त्यातील आव्हानांकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. सर्वप्रथम या नोटांच्या निर्मितीचा खर्च कागदी नोटांच्या तुलनेत किती असेल, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. सुरुवातीला उत्पादनासाठी आवश्यक तंत्रज्ञान, यंत्रसामग्री आणि पायाभूत सुविधा यासाठी मोठी गुंतवणूक करावी लागू शकते. त्यामुळे सरकारला दीर्घकालीन खर्च आणि बचत यांचा सखोल अभ्यास करावा लागेल. पर्यावरणाचा मुद्दाही तितकाच महत्त्वाचा आहे. प्लास्टिक हा शब्द ऐकताच पर्यावरणीय चिंतेचा प्रश्न निर्माण होतो. मात्र पॉलिमर चलनी नोटा सामान्य प्लास्टिक वस्तूंप्रमाणेच आहेत असे सरसकट मानणे योग्य ठरणार नाही.

# साहित्यातील अनभिषिक्त सम्राट गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

**महाकवी, युगपुरुष, भारताचे मानबिंदू, साहित्यातील अनभिषिक्त सम्राट, गीतांजलीकार, शब्दांचे जादूगार, काव्यऋषी, कवी, लेखक, तत्त्वज्ञ, भारताचे महान सुपुत्र, नोबेल पुरस्कार विजेते गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या ७ ऑगस्ट २०२६ रोजी असलेल्या ८५ व्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन?**



गुरुदेव रवींद्रनाथ टागोर हे भारताचे एक महान कवी, लेखक, तत्त्वज्ञ आणि संगीतकार होते. त्यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यामधील एका श्रीमंत आणि सुशिक्षित कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव देवेंद्रनाथ आणि आईचे नाव शारदा देवी होते. लहानपणापासूनच त्यांना वाचन, लेखन आणि निसर्गाची प्रचंड ओढ होती. त्यांनी वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी पहिली कविता लिहिली होती. त्यांनी 'भानुसिंह' या टोपण नावाने देखील सुरुवातीच्या काळात लेखन केले.

रवींद्रनाथ टागोरांनी भारताचे राष्ट्रगीत 'जन गण मन' ची रचना केली आहे. त्यांनी बांगलादेशचे राष्ट्रगीत 'अमार शोनार बांगला' देखील लिहिले आहे. दोन देशांचे राष्ट्रगीत लिहिणारे ते जगातील एकमेव कवी आहेत. त्यांच्या साहित्यातील अमूल्य योगदानाबद्दल त्यांना 'गुरुदेव' म्हणून ओळखले जाते. १९१३ मध्ये त्यांच्या 'गीतांजली' या काव्यसंग्रहासाठी त्यांना नोबेल पुरस्कार मिळाला.

नोबेल पुरस्कार मिळवणारे ते पहिले आशियाई आणि पहिले भारतीय व्यक्ती होते. त्यांच्या साहित्यात मानवी भावना, निसर्ग आणि राष्ट्रभक्तीचे सुंदर वर्णन आढळते. त्यांनी 'गोरा', 'घरे-बाइरे' आणि 'चोखेर बाली' यांसारख्या प्रसिद्ध कादंबऱ्या लिहिल्या. 'डाकघर' आणि 'काबुलीवाला' या त्यांच्या अत्यंत लोकप्रिय कथा आहेत. टागोरांनी सुमारे २,००० पेक्षा जास्त गाण्यांची रचना केली, ज्यांना 'रवींद्र संगीत' म्हणतात. त्यांनी वयाच्या ६० व्या वर्षानंतर चित्रकलेला सुरुवात केली आणि हजारो चित्रे काढली.

रवींद्रनाथ टागोर यांनी शांतिनिकेतन येथे 'विश्वभारती विद्यापीठाची' स्थापना केली. ही संस्था निसर्गाच्या सानिध्यात, खुल्या वातावरणात शिक्षण देण्यासाठी प्रसिद्ध आहे. ब्रिटीश सरकारने त्यांना 'सर' (नाइटहूड) ही मानाची पदवी दिली होती. मात्र १९१९ मधील जालियनवाला बाग हत्याकांडाचा निषेध म्हणून त्यांनी ही पदवी परत केली. त्यांचे विचार अत्यंत पुरोगामी, मानवतावादी आणि जागतिक शांततेला पूरक होते. त्यांनी महात्मा गांधींना 'महात्मा' ही पदवी दिली होती. गांधीजींनी त्यांना 'गुरुदेव' ही पदवी देऊन त्यांचा सन्मान केला होता. टागोरांचे साहित्य आजही जगभरातील लोकांना प्रेरित करत आहे. त्यांनी भारतीय संस्कृती आणि कला साहित्याला जागतिक पातळीवर एक नवी ओळख मिळवून दिली. त्यांचा जन्मदिवस 'रवींद्र जयंती' म्हणून दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. त्यांचे जीवन आणि विचार आजही प्रत्येक पिढीसाठी आदर्श आहेत. आधुनिक भारताच्या जडणघडणीत त्यांचे योगदान सदैव स्मरणात राहील.

'गीतांजली' हा भारतीय कवी, तत्त्वचिंतक आणि लेखक रवींद्रनाथ टागोर यांचा जगप्रसिद्ध अत्यंत लोकप्रिय आणि अद्वितीय काव्यसंग्रह आहे. या अजरामर कृतीने भारतीय साहित्याला जागतिक स्तरावर एक अभूतपूर्व ओळख मिळवून दिली. 'गीतांजली' हा शब्द गीत + अंजली दोन शब्दांनी बनलेला असून ज्याचा अर्थ 'गाण्यांचे अर्घ्य' किंवा 'गीतांचे देणे' असा आहे. हा काव्यसंग्रह मूळ बंगाली भाषेत लिहिलेला असून, तो १४ ऑगस्ट १९१० रोजी भारतात प्रकाशित झाला होता.

यामध्ये एकूण १५७ कवितांचा समावेश होता. रवींद्रनाथ टागोर यांना १९१३ मध्ये साहित्यासाठीचा प्रतिष्ठित 'नोबेल पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. साहित्यातील नोबेल पारितोषिक मिळवणारे ते पहिले भारतीय आणि पहिले बिगर-युरोपीय व्यक्ती ठरले. टागोरांनी स्वतः यातील निवडक कवितांचा इंग्रजीत गद्य-काव्यात्मक अनुवाद केला, जो १९१२ मध्ये लंडनच्या 'इंडिया सोसायटी'द्वारे प्रसिद्ध करण्यात आला. इंग्रजी आवृत्तीमध्ये १०३ कविता आहेत आणि त्याला प्रसिद्ध आयरिश कवी विल्यम बटलर येट्स यांनी सुंदर प्रस्तावना लिहिली. या काव्यसंग्रहाचा मुख्य गाभा अध्यात्म आणि निसर्गाप्रती असलेले अपार प्रेम हा आहे. केवळ धार्मिक पूजापाठ न करता, शेतात घाम गाळणाऱ्या शेतकऱ्यात आणि कष्टकऱ्यांमध्ये देव शोधण्याचा उदात्त संदेश यात दिला आहे. गीतांजलीतील ३५ वी कविता (इंग्रजी आवृत्तीनुसार) अत्यंत प्रसिद्ध आहे, ज्याची सुरुवात "Where the mind is without fear..." (जिथे चित्त भयशून्य असते...) अशी होते. यात त्यांनी भारतासाठी एका आदर्श आणि स्वतंत्र राष्ट्राची प्रार्थना केली आहे. गीतांजलीची रचना अत्यंत साधी, प्रासादिक भाषेत आणि संगीतमय आहे. ही केवळ वाचायची कविता नसून ती गाता येण्यासारखी पदे आहेत. रवींद्रनाथ टागोर यांच्या जगप्रसिद्ध 'गीतांजली' काव्यसंग्रहातील गाता येण्यासारख्या गेय कविता ज्यांना 'रवींद्र संगीत' म्हटले जाते त्या अनेक नामांकित आणि दिग्गज गायकांनी आपल्या सुमधुर आवाजात गायल्या आहेत. या कवितांचे गायन करणारे भारतीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय गायकांनीही तू सुमधुर आवाजात गायन केलेले आहेत. गीतांजली काव्यसंग्रहातील पारंपारिक बंगाली व इंग्रजी रचना कनिका बॅनर्जी आणि सुचित्रा मित्रा यांनी गायन केलेल्या आहेत. त्या रवींद्र संगीतातील अत्यंत आदरणीय आणि अग्रगण्य गायिका होत. हेमंत कुमार यांच्या धीरगंभीर आवाजातील गीतांजलीतील गीते प्रचंड लोकप्रिय झालेली आहेत. देबब्रत बिश्वास हे वेगळ्या शैलीत रवींद्र संगीत गाणारे प्रसिद्ध गायक आहेत. चिन्मय चॅटर्जी आणि द्विजेन मुखर्जी, शांतीदेव घोष टागोरांच्या सानिध्यात संगीत शिकलेले ज्येष्ठ गायक होतं.

आधुनिक आणि समकालीन लोकप्रिय गायकांमध्ये श्रावणी सेन, जयती चक्रवर्ती, स्वागतलक्ष्मी दासगुप्ता, श्रीराधा, अदिती मोहसिन, प्रमिता मल्लिक तसेच भारतीय चित्रपटसृष्टीतील पार्श्वगायक ज्यांनी हिंदी व इतर भाषांत या रचना गायल्या आहेत. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांनी अनेक बंगाली रवींद्र संगीत तसेच हिंदी अनुवादातील गाणी रेकॉर्ड केली आहेत. किशोर कुमार यांनी गायलेली रवींद्र संगीताची गाणी आजही ऐकली जातात. कविता कृष्णमूर्ती, श्रेया घोषाल, आणि अरिजीत सिंग या आधुनिक काळातील गायकांनीही गीतांजलीतील अनेक गाण्यांना नव्याने आवाज दिला आहे.

युनेस्कोच्या जागतिक स्तरावरील प्रतिनिधी संकलनाचा हा काव्यसंग्रह एक महत्त्वाचा भाग आहे. मराठीतही गीतांजलीचे अनेक लेखकांनी सुंदर भावानुवाद व रूपांतर केले आहे. 'गीतांजली' हे केवळ एका कवीचे काव्य नसून मानवतेला अर्पण केलेली एक भावांजली आहे.

**प्रा.अरुण बाबाराव बुंदेले**
**आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त**
**साहित्यिक व अभंगकार**
**अमरावती मो.८०८७७४९६०९**

# महिला आरक्षण : २०२९ च्या निवडणुकांसाठी आखलेले राजकीय गणित?




सप्टेंबर २०२३ मध्ये संसदेच्या विशेष अधिवेशनात ऐतिहासिक 'नारी शक्ती वंदन अधिनियम' - संविधान १०६ वी घटनादुरुस्ती कायदा, २०२३ मंजूर करण्यात आला. या कायद्यानुसार लोकसभा, सर्व राज्यांच्या विधानसभा आणि दिल्ली विधानसभेत महिलांसाठी ३३% जागा राखीव ठेवण्याची तरतूद करण्यात आली. परंतु, या कायद्याच्या अंमलबजावणीची अट अशी होती की, जनगणना आणि त्यानंतरची सीमांकन - परिसीमन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच तो प्रत्यक्षात लागू होईल.

**एप्रिल २०२६ : आरक्षणाला लागलेली खीळ** एप्रिल २०२६ मधील संसदेच्या विशेष अधिवेशनात महिला आरक्षणाला गती देणारे संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयक, २०२६ आणि संबंधित डिलिमिटेशन बिल मांडण्यात आले. मात्र घटनेने आवश्यक असलेले दोन-तृतीयांश विशेष बहुमत न मिळाल्यामुळे हे विधेयक लोकसभेत नामंजूर झाले.

**जागा वाढीचा प्रस्ताव : राजकीय सोय की सशक्तीकरण?** आजच्या घडीला लोकसभेच्या ५४३ जागांमधूनच सुमारे १८० जागा महिलांसाठी राखीव करता आल्या असत्या. पण तसे केल्यास अनेक विद्यमान पुरुष खासदारांचे राजकीय अस्तित्व धोक्यात आले असते. मोठ्या नेत्यांच्या खुर्च्या हलल्या असत्या आणि पक्षांतर्गत बंडाळी उभी राहिली असती. म्हणूनच एक वेगळा मार्ग स्वीकारला जात असल्याचे दिसते - मतदारसंघांची फेररचना करून एकूण जागा ८५० पर्यंत वाढवणे आणि त्यातील सुमारे २८० जागा महिलांसाठी राखीव ठेवणे. या पद्धतीमुळे विद्यमान नेत्यांनाही जागा मिळतील आणि महिलांनाही आरक्षण दिल्याचे भासवता येईल, म्हणजे दोन्ही बाजूंनी राजकीय फायदा. पण हा खरा महिला सशक्तीकरणाचा मार्ग आहे का, हा खरा प्रश्न आहे.

**लोकसभेतही 'सरपंच पती' पॅटर्न?** ग्रामपंचायत स्तरावर आपण 'सरपंच पती' ही संकल्पना पाहिली आहे. महिला सरपंच निवडून येतात, पण प्रत्यक्ष कारभार त्यांच्या पतींकडून चालवला जातो. याच पद्धतीचा विस्तार संसदेत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मोठे नेते स्वतःच्या पत्नी, मुलींना तिकीट देतील आणि सत्तेची सूत्रे मात्र स्वतःच्याच हातात ठेवतील. नाव महिलांचे, पण निर्णय पुरुषांचे - हेच का खरे सशक्तीकरण?

**परिसीमनातून निर्माण होणारा प्रादेशिक असमतोल** मतदारसंघ फेररचनेमुळे आणखी एक गंभीर असमतोल निर्माण होण्याची शक्यता आहे. ज्या राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणात यश मिळवले - जसे तमिळनाडू आणि केरळ - त्यांना तुलनेने कमी जागा मिळतील. उलट, जिथे लोकसंख्या झपाट्याने वाढली - जसे उत्तर प्रदेश आणि बिहार - तिथे जागांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढेल. यामुळे भविष्यात केवळ हिंदी पट्ट्यातील राज्यांवर आधारित सरकारे तयार होतील आणि दक्षिणेकडील राज्यांचा आवाज कमकुवत होईल, अशी भीती आहे.

**संसदेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह** सध्याच्या ५४३ खासदारांमध्येच सखोल चर्चा करायला पुरेसा वेळ मिळत नाही, तर ८५० खासदारांमध्ये परिस्थिती काय असेल? संसद ही विचारमंथनाची जागा न राहता जत्रेसारखी गोंधळाची जागा होईल, अशी भीती व्यक्त केली जाते. कायदे जलदगतीने मंजूर होतील, पण त्यामागील सखोल विचार कमी होईल.

**करदात्यांच्या तिजोरीवर अतिरिक्त भार** यात आणखी एक भयानक पैलू म्हणजे करदात्यांच्या पैशांची होणारी उधळपट्टी. सध्याच्या ५४३ खासदारांचाच महाकाय पगार, पेन्शन, भत्ते, अलिशान निवासस्थाने आणि परदेश दौऱ्यांचा सांभाळ करताना देश मेटाकुटीला आला आहे. त्यात आणखी ३०० हून अधिक अतिरिक्त खासदारांची भर पडल्यास त्यांच्या व्हीआयपी थाटमाटासाठी जनतेच्या तिजोरीतून दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा चुराडा होणार आहे. ज्या देशात पायाभूत सुविधांच्या अभावामुळे नागरिक रस्त्यांवरील खड्ड्यांत मरत आहेत, आरोग्य आणि शिक्षणाचा बोजवारा उडाला आहे, तिथे ८५० खासदारांच्या उठबस आणि मेजवान्यांसाठी हा अतिरिक्त भुर्दंड कशासाठी आणि कोणासाठी?

**समारोप** शेवटी, हे सर्व पाहता एक गोष्ट स्पष्ट होते - हे महिला आरक्षणाचे धोरण नसून २०२९ च्या निवडणुकांसाठी आखलेले राजकीय गणित असू शकते. जागा वाढवणे म्हणजे लोकप्रतिनिधींची फौज उभी करणे, ज्यामुळे आर्थिक भार वाढेल, घराणेशाहीला चालना मिळेल आणि करदात्यांच्या पैशांचा अपव्यय होईल. जनतेला भावनिक मुद्द्यांमध्ये गुंतवून ठेवणे, आकडेवारीने प्रभावित करणे आणि सत्तेचा विस्तार करणे - हीच सध्याची राजकीय दिशा असल्याचे चित्र समोर येते. महिला सशक्तीकरणाचा खरा अर्थ केवळ आरक्षणात नसून, त्यांच्या स्वायत्ततेत, सुरक्षिततेत आणि निर्णयक्षमतेत आहे - हे लक्षात घेणे अधिक गरजेचे आहे.

## आजचे राशिभविष्य

दिनांक : 12 ऑगस्ट 2026 मंगळवार

••• ग्रह-नक्षत्रांच्या चालीनुसार आजचा दिवस तुमच्यासाठी कसा असेल? वाचा आजचे राशिभविष्य... •••

**मेष** (21 मार्च - 19 एप्रिल) आजचा दिवस अनुकूल आहे. कामात गती येईल. नवे संपर्क लाभतील. आर्थिक प्रगतीची शक्यता. आरोग्याची काळजी घ्या.

**वृषभ** (20 एप्रिल - 20 मे) कुटुंबात सौख्यांचे वातावरण राहील. कामात स्थिरता येईल. खर्चावर नियंत्रण ठेवा. जुने प्रलंबित काम पूर्ण होतील.

**मिथुन** (21 मे - 20 जून) मानसिक ताण कमी होईल. नवीन योजना यशस्वी होतील. प्रवासाचा योग आहे. व्यवसायात लाभ होण्याची शक्यता.

**कर्क** (21 जून - 22 जुलै) आर्थिक स्थिती सुधारेल. घरातील प्रलंबित कामे पूर्ण होतील. नोकरीत बदलाची संधी मिळू शकते. आरोग्य ठीक राहील.

**सिंह** (23 जुलै - 22 ऑगस्ट) आत्मविश्वास वाढेल. नेतृत्वगुणांना वाव मिळेल. नोकरी-व्यवसायात प्रगती होईल. विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला.

**कन्या** (23 ऑगस्ट - 22 सप्टेंबर) कामात बारकाईने लक्ष देणे आवश्यक आहे. धनलाभ होण्याची शक्यता. कौटुंबिक जबाबदारी वाढेल. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका.

**तुल** (23 सप्टेंबर - 22 ऑक्टोबर) व्यवहारात संतुलन ठेवा. कोणत्याही वादात पडू नका. मिधी गुंतवणुकीत लाभ शक्य. मित्रपरिवाराचा सहकार्य लाभेल.

**वृश्चिक** (23 ऑक्टोबर - 21 नोव्हेंबर) अचानक धनलाभ होऊ शकतो. नोकरीत वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. प्रवास सुखद होईल. आरोग्य चांगले राहील.

**धनु** (22 नोव्हेंबर - 21 डिसेंबर) धार्मिक कार्यात मन रमेल. नवे ज्ञान मिळेल. परदेश प्रतासाचा योग आहे. व्यवसायात विस्तार होईल.

**मकर** (22 डिसेंबर - 19 जानेवारी) मेहनतीचे फळ मिळेल. नोकरीत मान-सन्मान वाढेल. आर्थिक स्थिती मजबूत होईल. कुटुंबासोबत आनंदी वेळ जाईल.

**कुंभ** (20 जानेवारी - 18 फेब्रुवारी) नवीन योजना राबविण्यासाठी दिवस चांगला. सामाजिक मान वाढेल. नोकरी-व्यवसायात सकारात्मक बदल होतील.

**मीन** (19 फेब्रुवारी - 20 मार्च) मन प्रसन्न राहील. सर्जनशील कामात यश मिळेल. प्रेमसंबंधात गोडवा वाढेल. आरोग्याची काळजी घ्या.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# टीईटी पेपरफुटीप्रकरणी सोलापूर कनेक्शन

## स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण केंद्र चालवणाऱ्या प्रकाश पवारला अटक

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***मुंबई*** – देशभर गाजलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटी प्रकरणात भिवंडी पोलिसांनी सोलापूर येथून एका आरोपीला अटक केली आहे.

प्रकाश धनसिंग पवार (४५) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पवार हा सोलापूर येथे 'ध्रुव अकॅडमी' नावाने पो–लीस भरतीसह विविध स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण केंद्र चालवत असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.



**पाच दिवसांची पोलिस कोठडी**

या प्रकरणातील पवारची अटक ही १६ वी आहे. आरोपी प्रकाश पवार यास भिवंडी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला १५ ऑगस्टपर्यंत पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. त्याच्याकडे २६ विद्यार्थ्यांचे पेपर सापडले असून त्यापैकी २० उत्तीर्ण झालेल्यांचे पेपर आढळून आले. त्यापैकी ५ पेपर टीईटी उत्तीर्ण झालेल्यांचे असल्याचा संशय आहे.

महाराष्ट्रातील धागेदोरेही समोर येणार? टीईटी पेपरफुटीप्रकरणी आतापर्यंत उत्तर प्रदेश, बिहार आणि हरयाणा येथून १५ जणांना अटक करण्यात आली होती. मात्र, महाराष्ट्रातील पेपरची विक्री नेमकी कोणाला करण्यात येणार होती, याचा तपास अद्याप सुरू होता.

आता सोलापुरातून आरोपीला अटक झाल्याने या प्रकरणाचे महाराष्ट्रातील धागेदोरेही समोर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# जिल्हा सामान्य रुग्णालयात 'ओआरएस सप्ताह' उत्साहात साजरा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**अमरावती** – जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथील बालरोग विभागात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली 'ओआरएस सप्ताह' जनजागृतीपर उपक्रमाने साजरा करण्यात आला. बालरोग विभागाच्या प्रमुख डॉ.सोनाली शिरभाते यांच्या पुढाकारातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

अतिसारासारख्या आजारांमध्ये शरीरातील पाणी व क्षारांचे प्रमाण कमी होऊन होणारे निर्जलीकरण टाळण्यासाठी ओआरएस हे अत्यंत प्रभावी व जीवनरक्षक द्रावण आहे. त्याचे महत्त्व, उपयोग तसेच ओआरएस योग्य पद्धतीने तयार करण्याची प्रक्रिया याबाबत डॉ.सोनाली शिरभाते यांनी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.



यावेळी परिचारिका प्रशिक्षण विद्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथील तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी जनजागृतीपर पथनाट्य सादर केले. या पथनाट्यातून अतिसाराची कारणे, अतिसार झाल्यास घ्यावयाची काळजी, ओआरएसचे योग्य प्रमाणात सेवन, ओआरएस तयार करण्याची पद्धत तसेच निर्जलीकरणाची लक्षणे याबाबत रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांमध्ये प्रभावी जनजागृती करण्यात आली.

या उपक्रमाला जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.विनोद पवार, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.प्रमोद नरवणे, बालरोग विभागप्रमुख डॉ.सोनाली शिरभाते, बालरोग परिचारिका श्रीमती प्रफुल्लता तायडे, बालरोग परिचारक श्री. मनोज ताडे, परिसेविका श्रीमती जोशना बोबडे, परिचारिका श्रीमती तेजस्विनी वानखडे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ६० वर्षे करा

## राजपत्रित अधिकारी महासंघाची मागणी

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***मुंबई*** – केंद्र सरकार आणि इतर २५ राज्यांच्या धर्तीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय सध्याच्या ५८ वर्षांवरून वाढवून ६० वर्षे करण्यात यावे, अशी विनंती महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

१० ऑगस्ट रोजी फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात महासंघाने म्हटले आहे की, केंद्र सरकारने १९९८ मध्ये आपल्या कर्मचाऱ्यांच्या



निवृत्तीचे वय ६० वर्षे केले होते आणि त्यानंतर २५ राज्यांनी हेच धोरण स्वीकारले. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरीम आदेशानुसार दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत न्यायिक अधिकाऱ्यांचे निवृत्तीचे वय ६२ वर्षे करण्याच्या राज्य सरकारच्या नुकत्याच घेतलेल्या निर्णयाचे महासंघाने स्वागत केले.

# नवीन सेवार्थ प्रणालीतील तांत्रिक अडचणींच्या निराकरणासाठी जिल्हा कोषागार कार्यालयात विशेष शिबिर

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

***अमरावती*** – नवीन सेवार्थ प्रणालीच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आहरण व संवितरण अधिकारी (डीडीओ) तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणीचे तात्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हा कोषागार कार्यालयाच्या जिजाऊ सभागृहात १२ ते १४ ऑगस्ट २०२६ दरम्यान विशेष तांत्रिक मार्गदर्शन व समस्या निवारण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

नवीन सेवार्थ प्रणालीमध्ये कामकाज करताना डाटा मायग्रेशन प्रणालीचा वापर तसेच विविध प्रक्रियांच्या अंमलबजावणीशी संबंधित तांत्रिक अडचणीचे निराकरण वेळेत होऊन कामकाज सुरळीतपणे सुरू राहावे. सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयाशी संबंधित तांत्रिक अडचणींची आवश्यक माहिती व तपशील सोबत घेऊन तसेच स्वतःचा लॅपटॉप सोबत घेऊन शिबिरास उपस्थित राहावे.

शिबिरामध्ये तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व आवश्यक तांत्रिक सहकार्य उपलब्ध होणार आहे. सर्व संबंधितांनी या विशेष शिबिराचा लाभ घेऊन आपल्या कार्यालयाशी संबंधित तात्रिक अडचणींचे वेळेत निराकरण करून घ्यावे व नवीन सेवार्य प्रणालीतील कामकाज सुरळीतपणे सुरू राहण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करावी, असे आवाहन वरिष्ठ कोषागार अधिकारी विजय जवंजाळ यांनी केले आहे.

# मनसे अध्यक्ष राज ठाकरे अचानक 'वर्षा'वर!

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***मुंबई*** – महाराष्ट्राच्या राजकीय वतुर्ळात आज सकाळपासून एका भेटीची जोरदार चर्चा सुरू आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. सकाळी सुमारे ८.२० वाजता राज ठाकरे यांचा ताफा 'वर्षा'वर दाखल झाला. यावेळी मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक हेही राज ठाकरे यांच्यासोबत असल्याची माहिती आहे. राज ठाकरे आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्यात



बंद दाराआड चर्चा सुरू असल्याने या भेटीमागे नेमका विषय काय, याबाबत राजकीय वतुर्ळात तर्क–वितर्कांना उधाण आले आहे. भेट पूर्वनियोजित असल्याची माहिती : राज ठाकरे अचानक 'वर्षा'वर पोहोचल्याने ही भेट ऐनवेळी ठरली असल्याचे प्रथमदर्शनी वाटत असले, तरी सूत्रांच्या माहितीनुसार ही बैठक पूर्वनियोजित होती. दोन दिवसांपूर्वीच या भेटीचे नियोजन करण्यात आले होते, अशी माहिती समोर आली आहे. त्यामुळे या भेटीला सध्या सुरू असलेल्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

# १५ लाखांची लाच मागितली, आठ लाख स्वीकारले : जीएसटी उपायुक्तावर गुन्हा दाखल

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – जीएसटी स्कुटनी आणि जीएसटी क्रेडिटच्या नोटीसची चौकशी थांबवण्यासाठी १५ लाखांची मागणी करुन ८ लाख रुपयांची लाच उकळल्याप्रकरणी राज्यकर उपायुक्त दीपक क्षीरसागर यांना अटक करण्यात



आली आहे. नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ही धडक कारवाई करत त्यांना माझगाव येथील विक्रीकर विभागाच्या कार्यालयातून ताब्यात घेतले. तपासादरम्यान, कोकण भवन (बेलापूर) येथील विक्रीकर विभागात सहायक आयुक्त पदावर कार्यरत असताना त्यांनी ही लाच स्वीकारल्याचे निष्पन्न झाले आहे. १५ लाखांची मागणी अन ८ लाखांवर तडजोड मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी दीपक क्षीरसागर यांनी बजावलेल्या एका जीएसटी स्कुटनी आणि जीएसटी क्रेडिट नोटीसची चौकशी थांबवण्यासाठी तक्रारदाराकडे १५ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तक्रारदारासोबत तडजोड करून त्यांनी ८ लाख रुपये लाच म्हणून स्वीकारल्याचा आरोप तक्रारदाराने केला होता. चौकशीत दोष सिद्ध होताच माझगावमधून अटक तक्रारदाराच्या अर्जावरून नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक धर्मराज सोनके यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू होती. चौकशी दरम्यान दीपक क्षीरसागर यांनी ८ लाख रुपयांची लाच घेतल्याचे निष्पन्न झाल्यानंतर मंगळवारी लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने माझगाव येथील विक्रीकर भवन कार्यालयात छापा टाकून त्यांना ताब्यात घेतले आणि बेलापूर पो–लीस ठाण्यात गुन्हा दाखल करून अधिकृत अटक केली.

# देवेंद्र फडणवीसांच्या नागपूरमधील कार्यक्रमाला ४० नगरसेवकांची दांडी

**भाजप कारणे दाखवा नोटीस धाडण्याच्या तयारीत**

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**नागपूर** – नागपुरातील भाजपच्या गोटातून एक महत्वाची बातमी समोर आली आहे.

मुख्यमंत्र्यांच्या गृहजिल्ह्यात अर्थात नागपुरात आयोजीत मुख्यमंत्र्यांच्याच कार्यक्रमाला दांडी मारणाऱ्या भाजप नगरसेवकांना आता नोटीस देण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. रविवारी सुरेश भट सभागृहात दिव्यांगाना साहित्य वाटप शिबिराचा समारोप मुख्यमंत्र्याच्या हस्ते पार पडला.

या कार्यक्रमात भाजपच्या ११० नगरसेवकांनी उपस्थित राहणे अपेक्षित होते. मात्र



त्यातील ४० भाजप नगरसेवकांनी दांडी मारली. परिणामी, अनुपस्थित राहणाऱ्या नगरसेवकांची आता यादी तयार करण्यात आली असून त्यांना नोटिस बजावण्याचा निर्णय मनपा सत्तापक्ष नेते बाल्या बोरकर यांनी घेतला आहे.

दरम्यान, पूर्वसूचना आणि उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आल्यानंतरही ४० नगरसेवकांनी दांडी मारली. परिणामी या ४० भाजप नगरसेवकांना आता नोटीस बजावण्यात येणार आहे. तर अनुपस्थितीचे कारण स्पष्ट करण्याच्या सूचना या नोटीसमधून देण्यात येणार आहे. त्यामुळे आता भाजप पुढे या प्रकरणी नेमकी काय कारवाई करतं का? हे पाहणं देखील महत्वाचे ठरणार आहे.

अस्थिव्यंग व कर्णबधिर दिव्यांग व्यक्तींना निःशुल्क जयपूर फूट साहित्य व सहाय्यक साधनांचे वाटप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवारी नागपूर जिल्ह्यातील अस्थिव्यंग व कर्णबधिर दिव्यांग व्यक्तींना निःशुल्क जयपूर फूट साहित्य व सहाय्यक साधनांचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, देशभरात प्रसिद्ध झालेल्या जयपूर फूट आणि इतर दिव्यांग सहाय्यता साहित्यामुळे अनेक दिव्यांगांच्या जीवनात परिवर्तन घडवणे शक्य झाले आहे.

कृत्रिम पाय, हात तसेच अन्य कृत्रिम अवयव बसविल्यानंतर दिव्यांग व्यक्तींना दैनंदिन जीवनातील विविध कामे अधिक सुलभपणे करता येतात. या माध्यमातून त्यांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यास मदत होते. भगवान महावीर विकलांग सहाय्यता समिती ही १९७५ पासून देशात आणि देशाबाहेर दिव्यांग व्यक्तींना सहाय्य करण्याचे उल्लेखनीय कार्य करीत आहे.

## स्वामी विवेकानंद कॉलेज येथे अध्यापन कौशल्य विषयावर

# ५ दिवसीय प्राध्यापक विकास कार्यशाळेचे आयोजन

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स येथे शैक्षणिक सत्र २०२६–२७ अंतर्गत प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत 'अध्यापन कौशल्य' या विषयावर पाच दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. कॉलेजच्या प्राचार्य डॉ.प्राची ठाकरे यांनी कार्यशाळा घेण्यामागील हेतु प्रास्ताविकात मांडला.

विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू असून शिक्षकांनी यावेळी ज्ञानदाता, मार्गदर्शक, समुपदेशक म्हणून सर्वांगीण भूमिका पार पाडणे आवश्यक आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेत स्व.शिवरामजी हिवसे अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य किशोर तडस, प्रा.प्रियंका इंगोले, प्रा.भारती



ठाकरे आणि प्रा.राजू गोलाईत यांनी मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून प्राध्यापकांना अध्यापनातील विविध कौशल्ये, प्रभावी संवाद, विद्यार्थी केंद्रित अध्यापन पद्धती तसेच आधुनिक अध्यापन तंत्रांविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. ५ दिवसांच्या या कार्यशाळेदरम्यान प्राध्यापकांनी विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. बदलत्या शैक्षणिक वातावरणात प्रभावी अध्यापनासाठी आवश्यक असलेली कौशल्ये विकसित करणे, विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे आणि अध्यापन अधिक परिणामकारक व नाविन्यपूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यशाळा उपयुक्त ठरली.

या कार्यशाळेला ग्रंथालयशास्त्र विभागप्रमुख प्रा.विजय ठाकरे, बीबीए विभागप्रमुख प्रा.चेतन गणोरकर, बीसीए विभागप्रमुख प्रा.अनुप बेले, बीएजेएमसी विभागप्रमुख प्रा.राहुल शिवारे, प्रा.सौरव आकोटकर, प्रा.आशिष शहाणे, प्रा.प्रफुल्ल बहुरुपी, प्रा.राजकुमार वानखडे, प्रा.संजीवनी बारस्कर, प्रा.आलिया खान, प्रा.साक्षी राठी, प्रा.माधवी घोरमाडे तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक उपस्थित होते.

प्राध्यापकांच्या अध्यापन कौशल्यात वृद्धी करुन विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, हा या प्राध्यापक विकास कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कार्यशाळेतील मार्गदर्शनामुळे प्राध्यापकांना आपल्या अध्यापन पद्धती अधिक प्रभावी आणि विद्यार्थीभिमुख करण्यासाठी निश्चितच प्रेरणा मिळाली.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून वकिलांसाठी ४० तासांचे प्रशिक्षण : जिल्हयातील ४७ वकिलांचा सहभाग

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावती यांच्या वतीने वकिलांसाठी ७ ते ११ ऑगस्ट २०२६ या कालावधीत ४० तासांचे मध्यस्थी प्रशिक्षण जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती येथे सुरु आहे. अमरावती जिल्हयातील एकूण ४७ वकील प्रशिक्षण घेत असून त्याचा फायदा पक्षकारांना व न्यायालयाला होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे वरिष्ठ अधिवक्ता प्रथमेश पोपट, न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बेलापुर, ठाणे सी. एन. ऑडरे यांच्या मार्फत प्रशिक्षणार्थी वकिलांना मध्यस्थीचे ४० तासांचे सखोल प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रशिक्षणामध्ये प्रत्यक्ष उदाहरणे, चर्चासत्रे, प्रश्नोत्तर सत्र, तसेच ध्यान, प्रत्यक्ष मध्यस्थी सत्र अनुकरणाचा समावेश करण्यात आला आहे.



या प्रशिक्षणात वकिलांना मध्यस्थी प्रक्रियेबाबत सैद्धांतिक तसेच व्यावहारिक प्रशिक्षण देण्यात येत आहे. मध्यस्थीची संकल्पना व महत्त्व, मध्यस्थाची भूमिका व जबाबदाऱ्या, पक्षकारांशी प्रभावी संवाद, वाटाघाटीची कौशल्ये, विवाद निराकरणाच्या विविध पद्धती, मध्यस्थीची प्रक्रिया तसेच मध्यस्थीतील व्यावहारिक बाबी याबाबत प्रशिक्षण देण्यात येत आहे.

---

# अर्थखातं आणि सहकार खात्याकडून फाईलवर नेगेटिव्ह शेरा तरीही अभिमन्यू पवारांच्या कारखान्याला १८ कोटींचं कर्ज, थेट मंत्रिमंडळानेच आदेश काढला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – भाजपचे आमदार अभिमन्यू पवार यांच्यावर सरकार मेहरबान आहे का? असा प्रश्न आता विचारला जाऊ लागला आहे.

सहकार आणि वित्त विभागाचा विरोध डावलून पवार यांच्या कारखान्याला राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून १८ कोटींचे कर्ज घेण्यास मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्याचे समोर आलं आहे.



किल्लारी येथील निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्यास मदत करण्यात आली आहे. दरम्यान, सरकारने यापूर्वी देखील गाळप क्षमता दुप्पट करण्यासाठी १८ कोटींचे शेअर कॅपिटल दिले असून आता पुन्हा एकदा राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून भांडवली खर्च व खेळत्या भांडवलासाठी २५ कोटी रुपयांचे कर्ज मिळण्याबाबतचा प्रस्ताव कारखान्याने साखर आयुक्तांना दिला होता.

अशातच, कारखाना काही वर्ष बंद असल्याने एनसीडीसीच्या कर्जासाठीच्या निकषात बसत नसल्याचे सांगत सहकार आणि वित्त विभागाने कारखान्यास शासन हमीवर कर्ज देण्यास, तसेच त्याबाबतचा प्रस्ताव एनसीडीसीलला पाठवायला विरोध केला असल्याची सूत्रांची माहिती आहे. तर अभिमन्यू पवार यांनी पूर्वी मुख्यमंत्र्यांचे स्वीय सहायक म्हणून काम पाहिले होते. त्यामुळे अनेक प्रश्न आता राजकीय वतुर्ळात विचारले जात आहे.

अशातच या सर्व प्रकरणावर सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी प्रतिक्रिया देत भाष्य केलं आहे. ते म्हणाले की, अभिमन्यू पवार यांच्या कारखान्याला कर्ज देण्यात आलं आहे. १८ कोटी कर्ज देण्यात आलं आहे. यापूर्वी देखील कर्ज देण्यात आलं होतं. अर्थ खाते, सहकार खाते यांनी त्यांना कर्ज द्यायला निगेटिव्ह शेरा दिला होता. मात्र कर्ज कुणाला द्यायच आणि कुणाला नाही हा सर्वस्वी निर्णय मंत्रिमंडळाचा आहे.

---

जाहीर नोटीस

## कोर्ट विद्यमान तहसिलदार, नरखेड यांचे कार्यालय

रा.मा.क्र३१०/एम.आर.सी.८१/२६ दि.११/०६/२६

**तहसिलदार नरखेड यांचे कार्यालय,**
**ता.नरखेड, जि.नागपूर**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदार **सौ.मोना अमोल श्रृंगारे, रा.अंबाडा, ता.नरखेड, जि.नागपूर** यांनी त्यांची **मुलगी रानु अमोल श्रृंगारे यांचा जन्म मौजा अंबाडा, ता.नरखेड, जि.नागपूर येथे दि.०७/१०/२०११** रोजी झाला असून **रानु अमोल श्रृंगारे** हया नावाचे जन्माची नोंद होण्याबाबत आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज सादर केलेला आहे.

तरी नमुद व्यक्तीच्या नोंदणीबाबत ज्यांना आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी **दि.२६/०६/२०२६** पर्यंत कार्यालयीन वेळेत या कायालयास लेखी स्वरुपात सादर करावे.

उपरोक्त तारखेपुर्वी, कोणाचाही कोणताही आक्षेप उजर प्राप्त झाला नाही तर सदर जन्मनोंद आदेश मंजूर करुन निबंधक जन्म व मृत्यू **ग्रामपंचायत अंबाडा, ता.नरखेड, जि.नागपूर यांना** पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

जाहीरनामा आज **दि.१५/०६/२०२६** रोजी माझे सहीने व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द करण्यात आला.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

जाहीर नोटीस

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

क्र.प्रस्तु-१/कावी-३२८/२५-२६ दि.०२/०७/२६

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **हमीदा बानो सैय्यद अब्बास, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे हमीदा बानो सैय्यद अब्बास, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.११/०६/१९६४** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी ०२/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

---

# कुंभमेळ्याच्या गर्दीपूर्वी आपत्ती प्रतिसाद व्यवस्थेचा 'ग्राउंड चेक', घाटांची संयुक्त पाहणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – सिंहस्थ कुंभमेळा २०२७मध्ये अपेक्षित असलेल्या मोठ्या भाविक गर्दीच्या पार्श्वभूमीवर आपत्ती प्रतिसाद व्यवस्था प्रत्यक्ष मैदानावर तपासण्यास सुरुवात झाली आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने मंगळवारी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या अधिकाऱ्यांसमवेत उच्चस्तरीय बैठक घेऊन आपत्ती व्यवस्थापनाच्या तयारीचा आढावा घेतला. त्यानंतर नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमधील प्रमुख घाटांची संयुक्त पाहणी करण्यात आली. आपत्ती प्रतिसाद व्यवस्थेचा 'ग्राउंड चेक' कुंभमेळ्याच्या काळात मोठ्या संख्येने भाविक दाखल होणार असल्याने गर्दी व्यवस्थापन, भाविकांची वाहतूक, आपत्कालीन प्रतिसाद आणि विविध यंत्रणांमधील समन्वय यावर बैठकीत चर्चा करण्यात आली. आपत्तीच्या प्रसंगी राष्ट्रीय व राज्य आपत्ती प्रतिसाद दल तसेच अन्य बचाव यंत्रणांची रणनीतीनुसार तैनाती, महत्त्वाची ठिकाणे, आपत्कालीन मार्ग, स्टेजिंग एरिया आणि प्रतिसाद केंद्रे निश्चित करण्याबाबत आढावा घेण्यात आला. आपत्कालीन परिस्थितीत बचाव पथकांना घटनास्थळी कमीत कमी वेळेत पोहोचता यावे, यासाठी महत्त्वाची ठिकाणे आणि प्रवेशमार्ग निश्चित करण्यावर भर देण्यात आला.



---

जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.३६२/२०२६ ने.ता.०२/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती यशोदा राजेरामजी बासंदे, वयअं.७३ वर्ष,धंदा-घरकाम
२) जगदीश राजेरामजी बासंदे, वय अं.४० वर्ष, धंदा- मजुरी
मु.वंडली, पो.गाडेगांव, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत राजेराम बळीराम बासंदे, रा.वंडली, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०२/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६३१/२०२६ ने.ता.३१/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती लता वसंत डकरे, वय अं.६४ वर्ष, धंदा-मजुरी, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती, २) सौ.प्रिती विकास सातपुते, वय अं.३६ वर्ष, धंदा-घरकाम, रा.शिरजगांव कसबा, ता.चांदुरबाजार, ३) सौ.दिपाली विवेकराव इंगोले, वय अं.३३ वर्ष, धंदा- घरकाम, रा.जरुड, ता.वरुड, ४) सौ.रुपाली योगेश दाढे, वय अं.३१ वर्ष, धंदा- घरकाम, रा.मारुड, ता.जि.पांढुर्णा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत वसंत उर्फ वसंता माधव डकरे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३१/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२७/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६३२/२०२६ ने.ता.२८/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती विमल विश्वेश्वर वालुरकर, वय अं.६९ वर्ष, धंदा-घरकाम, २) हेमराज विश्वेश्वर वालुरकर, वय अं.५४ वर्ष, धंदा- शेती, रा.नागपूर, ता.जि.नागपूर, ३) हेमेंद्र विश्वेश्वर वालुरकर, वय अं.५० वर्ष, धंदा- शेती, क्र.१ व ३ रा.सातनुर, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत विश्वेश्वर तुळशिराम वालुरकर, रा.सातनुर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२७/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६६०/२०२६ ने.ता.०८/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) प्रमिला मोतिराम चापेकर, वय अं.७० वर्ष, धंदा-घरकाम
२) अरविंद मोतिराम चापेकर, वय अं.४२ वर्ष, धंदा- शेती
३) सचिन मोतिराम चापेकर, वय अं.३८ वर्ष, धंदा- शेती
४) योगिता मोतिराम चापेकर, वय अं.३१ वर्ष, धंदा- घरकाम
सर्व रा.खैरगांव, ता.नरखेड, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत मोतिराम नागोराव चापेकर, रा.खैरगांव, ता.नरखेड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०८/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२३/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# लवकरच १० आणि २० रुपयांच्या प्लास्टिक नोटा

**एक अब्ज पॉलिमर नोटांच्या चाचणीला मंजुरी : अर्थमंत्री सीतारामन यांची माहिती**

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**नवी दिल्ली** – १० आणि २० रुपये मूल्याच्या प्रत्येकी एक अब्ज पॉलिमर म्हणजेच प्लास्टिकच्या नोटा चलनात आणण्याच्या क्षेत्रीय चाचणीला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी संसदेत दिली. भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) केलेल्या



प्रस्तावानुसार कागदी चलनी नोटांसोबतच या नोटाही जारी केल्या जाणार आहेत. दरम्यान, अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी २७ जुलै रोजी लोकसभेत लेखी उत्तरात याबाबत अधिक माहिती दिली होती. आंतरराष्ट्रीय अभ्यासांनुसार पॉलिमर नोटांचे आयुष्य कागदी नोटांच्या तुलनेत लक्षणीयरीत्या अधिक असते, असे त्यात म्हटले होते. पॉलिमर नोटा जारी करण्याची प्रक्रिया सध्या प्राथमिक टप्प्यात असून, त्यांचा डिजिटल पेमेंटवर काही परिणाम होतो का, हे या नोटांचा नियमित वापर सुरू झाल्यानंतरच स्पष्ट होऊ शकेल.

जागतिक निविदा प्रक्रिया १७ जुलै रोजी आरबीआयच्या मालकीच्या भारतीय रिझर्व्ह बँक नोट मुद्रण प्रायव्हेट लिमिटेडने पॉलिमर चलनी नोटांच्या छपाईसाठी वापरल्या जाणाऱ्या पॉलिमर सब्स्ट्रेटच्या उत्पादन व पुरवठ्यासाठी जागतिक स्तरावर इरादापत्रे मागवली आहेत.

# दिल्लीहून फुकेटला जाणाऱ्या विमानातील टर्ब्युलन्सप्रकरणी मोठा खुलासा, पायलटनं गांजा घेऊन विमान उडवत असल्याचं उघड, दोन्ही डोप टेस्ट पॉझिटिव्ह

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**नवी दिल्ली** – दिल्लीहून फुकेटला जाणाऱ्या विमानातील टर्ब्युलन्सप्रकरणी मोठी माहिती समोर आली आहे. यात पायलट गांजा घेऊन विमान उडवत असल्याचं तपासात उघड झालं आहे. या प्रकरणातील दोन्ही डोप टेस्ट पॉझिटिव्ह आली असून सध्या अधिक चौकशी सुरु असल्याची माहिती आहे. ४ ऑगस्ट रोजी फुकेतहून दिल्लीला जाणाऱ्या एअर इंडियाच्या एआय२३७९ विमानातील हवेच्या झोतामुळे झालेल्या घटनेच्या तपासात आता हा महत्त्वपूर्ण खुलासा समोर आला आहे.

दरम्यान, सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुरवातीला मुख्य वैमानिकाची प्राथमिक तपासणी चाचणी नकारात्मक नव्हती. याचा अर्थ, चाचणीत काहीतरी संकेत आढळले, ज्यामुळे पुढील चाचणी करणे आवश्यक होते. किंबहुना, प्राथमिक तपासणी चाचणीला अंतिम पुष्टी मानले जात नाही. काही विशिष्ट औषधे किंवा इतर घटकांमुळे देखील चाचणीचा निकाल चुकीचा सकारात्मक येऊ शकतो. परिणामी, यानंतर पुन्हा एकदा कन्फर्मेटरी टेस्ट करण्यात आली.

# अश्लील चित्रफीत प्रकरणातील अयान अहमदला जामीन

**प्रकरणातील सर्व ८ आरोपींची सुटका**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**परतवाडा** – अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतलेल्या कथित अल्पवयीन लैंगिक शोषण आणि अश्लील चित्रफीत दुवा प्रकरणातील मुख्य आरोपी अयान अहमद याला अचलपूर येथील जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक १ ने जामीन मंजूर केला आहे.



तपासात सहकार्य करण्याची अट घालत न्यायालयाने अयान अहमदला दिलासा दिल्याने या प्रकरणातील नाव असलेले सर्व ८ आरोपी आता जामिनावर बाहेर आले आहेत. यापूर्वी मानव सुगंधे याच्यासह अन्य आरोपींनाही न्यायालयाकडून जामीन मिळाला होता. समाजमाध्यमांवर कथित अश्लील चित्रफीत आणि त्यासंबंधीचा दुवा प्रसारित झाल्यानंतर हे प्रकरण चर्चेत आले होते.

त्यानंतर या प्रकरणावरून अमरावती जिल्ह्यात राजकीय आणि सामाजिक पातळीवर मोठी चर्चा झाली. पोलिसांनी समाजमाध्यमांवरील प्रसाराचा तपास करत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला होता. अयान अहमद याच्यासह अन्य आरोपींवर भारतीय न्याय संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान मातील अधिनिय विविध तरतुदींनुसार कारवाई करण्यात आली होती. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपींना अटक करून न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले होते. या सुनावणीदरम्यान ज्येष्ठ अधिवक्ता वकार अहमद यांनी आरोपींची बाजू मांडली. अभियोजन पक्षाकडून आरोप सिद्ध करणारे ठोस आणि थेट पुरावे पुरेसे उपलब्ध नसल्याचा युक्तिवाद त्यांनी केला.

# तब्बल ९८ लाख रुपयांच्या बनावट नोटांचा साठा जप्त

**एकाला अटक, ३० लाखांच्या बदल्यात १ कोटींचा भाव**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**पालघर** – जिल्ह्यातील वसई येथे बनावट भारतीय चलनी नोटांचा पर्दाफाश करण्यात आला आहे. ५०० रुपयांच्या बनावट नोटांची विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या एका व्यक्तीला वसई गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली. आरोपीकडून ५०० रुपयांच्या तब्बल १९ हजार ५८२ बनावट नोटा



जप्त करण्यात आल्या असून, या नोटांची दर्शनी किंमत ९७ लाख ८१ हजार रुपये इतकी आहे. विशेष म्हणजे जवळपास एक कोटींच्या नोटा ३० लाख रुपयांना विक्रीचा डाव होता, तसाच भाव ठरला होता. याप्रकरणात आंतरराष्ट्रीय रॅकेटचा सहभा आहे का, याचा अधिक तपास पोलीस करत आहेत. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांच्या क्राईम युनिट २ ला, मुंबई–अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील शिरसाड फाटा परिसरात सापळा रचून विरारच्या मांडवी पोलीस ठाण्याहद्दीत काशिदकोपर येथे आरोपी असल्याची माहिती मिळाली होती.

# २४ तासांत चार अपघात : दोन बळी

**नांदगावपेठ, वलगाव, चिखलदरा, मोर्शीतील घटना**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**अमरावती** – जिल्ह्यात गेल्या २४ तासांत चार वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या रस्ते अपघातांनी सुरक्षित प्रवासाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नांदगावपेठ येथे दुचाकी दुभाजकावर आदळून नंदकिशोर महादेव इंगळे यांचा मृत्यू झाला. वलगाव परिसरात वाहन उलटून गजानन लक्ष्मण वसू यांचा जीव गेला.

चिखलदरा येथे घोड्याच्या धडकेत दहा वर्षीय मुलगी गंभीर जखमी झाली तर मोर्शी परिसरात अज्ञात चारचाकीच्या धडकेत प्रतीक मनोहर उईके गंभीर जखमी झाले. चारही घटनांची संबंधित पोलिस ठाण्यांकडून चौकशी सुरू आहे. नांदगावपेठ येथील रहिवासी नंदकिशोर महादेव इंगळे हे दि. १० ऑगस्ट रोजी दुपारी एकच्या सुमारास एमएच–२७–सीटी–१४३३ क्रमांकाच्या दुचाकीने अमरावतीकडे निघाले होते. रहाटगाव उड्डाणपुलाजवळ त्यांची दुचाकी रस्त्याच्या दुभाजकावर आदळली. या धडकेत त्यांच्या डोक्याला आणि छातीला गंभीर दुखापत झाली. त्यांच्या चुलत भावाने अंकुश बानापुरे यांच्या तक्रारीवरून नांदगावपेठ पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम २८१ व १०६ अन्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# खा.अमर काळे यांनी घेतली पंतप्रधान नरेंद्र मोंदीची भेट

**वर्धा लोकसभा मतदारसंघातील प्रलंबित कामांचा वाचला पाढा**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – वर्धा येथील विकासाचा आवाज अखेर थेट दिल्लीच्या सत्ताकेंद्रात घुमला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या सर्व खासदारांनी पक्षाच्या कार्याध्यक्ष खा.सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली. या भेटीत वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांनी जिल्ह्याच्या प्रलंबित प्रश्नांचा अक्षरश पाढाच पंतप्रधानांसमोर मांडला. वर्ध्याच्या विकासासाठी केंद्र सरकारने विशेष लक्ष द्यावे, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

वर्धा जिल्ह्यातील विकासकामांना गती देण्यासाठी खासदारांच्या स्थानिक विकास निधीत वाढ करण्याची मागणी काळे यांनी केली. उपलब्ध निधीच्या मर्यादेमुळे अनेक विकासकामांना अपेक्षित गती मिळत नसल्याने स्थानिक पातळीवरील गरजा पूर्ण करण्यासाठी खासदार निधीत वाढ करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडेही त्यांनी केंद्राचे लक्ष वेधले. शेतीमाल, शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी आणि ग्रामीण भागातील विकासाच्या प्रश्नांवर केंद्राने ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी करण्यात आली. विशेषत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत



घरकुल मंजूर होऊनही अनेक लाभार्थ्यांना निधी मिळण्यासाठी विलंब होत असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. घरकुल मंजूर झाले, मात्र निधीच्या प्रतीक्षेत लाभार्थ्यांची घरे रखडली, अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी मंजूर घरकुलांचा निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याची मागणी काळे यांनी केली. इपीएस–९५ पेन्शनधारकांच्या प्रलंबित मागण्यांवर केंद्र सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे केंद्राने गांभीर्याने पाहून पेन्शनधारकांना दिलासा द्यावा, अशी भूमिका मांडण्यात आली, महाराष्ट्रातील केंद्रीय ओबीसी यादीत समावेशासाठी प्रलंबित असलेल्या २७ जातींच्या प्रस्तावाला मंजुरी देण्याची मागणीही पंतप्रधानांसमोर करण्यात आली. या निर्णयामुळे संबंधित समाजघटकांना मोठा दिलासा मिळू शकतो, असा मुद्दा यावेळी अधोरेखित करण्यात आला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्याची मागणीही करण्यात आली. महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात या महापुरुषांचे योगदान मोठे असून त्यांच्या कार्याचा राष्ट्रीय पातळीवर गौरव व्हावा, अशी भूमिका खासदारांनी मांडली. खासदारांनी आपापल्या मतदारसंघातील प्रश्न केंद्राच्या सर्वोच्च नेतृत्वापर्यंत पोहोचविले. मात्र वर्ध्याच्या विकासासाठी केंद्र सरकारने विशेष लक्ष द्यावे, हा मुद्दा अमर काळे यांनी ठामपणे मांडत जिल्ह्याच्या प्रश्नांना दिल्लीच्या दरबारात आवाज दिला. आता या मागण्यांवर केंद्र सरकारकडून कोणती पावले उचलली जातात? याकडे वर्धा जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

